# उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा शहरात अस्तित्वाचा प्रश्न

मोहनीराज लहाडे, लोकसत्ता

## मनपा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून प्रवेश

शिवसेनेत फूट पडली, त्यावेळी काही मोजक्याच नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्याचवेळी पक्षाला गळती लागल्याची चिन्हे होती. त्याचीही दखल घेतली गेली नाही. एकनाथ शिंदे यांच्यावर निवडणुकीत टीका करणारेही आता पक्षप्रवेश करू लागले आहेत. अलीकडच्या काळात महिना-दीड महिन्यापूर्वी मोठा गट पक्ष सोडून जाणार असल्याची चाहूल लागली होती. त्याचीही दखल घेतली गेली नाही. उद्योग मंत्री उदय सामंत अहिल्यानगर शहराच्या दौऱ्यावर आल्यानंतर मोठे खिंडार पडले. आता उर्वरित माजी नगरसेवक, पदाधिकारी पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत. मनपा निवडणूक काही महिने पुढे गेली असली तरी चार नगरसेवकांचा प्रभाग रचना असेल असे गृहीत धरून प्रभागनिहाय पॅनलची निर्मिती डोळ्यासमोर ठेवून हे प्रवेश घडत आहेत. ठाकरे गटाचे वरिष्ठ हातबलतेने ही परिस्थिती पाहत आहेत.

**अहिल्यानगर :** विधानसभेच्या निवडणुकीनंतर अहिल्यानगर शहरातील शिवसेनेच्या ठाकरे गटाला लागलेल्या गळतीचा वेग पाहता हा पक्ष शहरातून नामशेष होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ठाकरे गटाला लागोपाठ दुसऱ्यांदा मोठे खिंडार पडले. त्यातून शहरप्रमुखासह अनेक माजी नगरसेवक, पदाधिकारी, शाखाप्रमुख, कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करण्याची रांग लावली आहे. त्यामुळे आगामी महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गटाला पुरेसे उमेदवार तरी उपलब्ध होऊ शकतील की नाही, याची चर्चा आताच सुरु झाली आहे.

अहिल्यानगर शहर पूर्वी एकत्रित शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. शहरावर शिवसेनेने दीर्घकाळ वर्चस्व ठेवले. परंतु विधानसभा निवडणुकीनंतर अवघ्या दोन महिन्यातच ठाकरे गटाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ठाकरे गट सोडून शिवसेनेत प्रवेश होत आहेत ते महापालिकेची आगामी निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच. विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा हा परिणामही मानला जातो. जिल्ह्यात आता ठाकरे गटाला कोणी नेता उरलेला नाही. गळती रोखण्यासाठी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे यांनी शहरात धाव घेतली. मात्र, त्याचा उपयोग झाला नाही. गुरुवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ठाकरे गटाच्या तब्बल ४० पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

एकत्रित शिवसेनेचे दिवंगत उपनेते अनिल राठोड यांनी शहरावर दीर्घकाळ राज्य केले. महापालिकेवरही शिवसेना दीर्घकाळ सत्ता होती. मात्र राठोड यांच्या निधनानंतर जिल्ह्यात शिवसेनेला एकत्रित बांधून ठेवेल असं नेताच राहिलेला नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर शंकरराव गडाख यांनी शिवसेनेत प्रवेश केला व मंत्रिपद मिळवले. मात्र जिल्ह्यात त्याचा पक्षाला काहीच उपयोग होऊ शकला नाही. गेल्या वेळीच शिवसेनेचा एकही आमदार जिल्ह्यात विजयी होऊ शकला नाही. फुटीनंतर ठाकरे गटाची ही परिस्थिती यंदाही कायम राहिली तर शिंदे गटाचे भाजपकडून आयात केलेले दोन उमेदवार विजयी झालेले आहेत.

पक्षाला सोडचिठ्ठी देणाऱ्यांचा प्रामुख्याने रोष आहे तो खासदार संजय राऊत यांच्याबद्दल. विधानसभा निवडणुकीत जिल्ह्याची जबाबदारी राऊत यांच्यावर होती. दगाबाजी करून अहिल्यानगर शहराची जागा सोडण्यात आल्याचा जाहीर आरोपच राऊत यांच्यावर करण्यात आले. त्याची खदखद वेळोवेळी प्रकट झाली. मात्र, पक्षाने त्याची दखल घेतली नाही. बेदखल झालेले पदाधिकारी आता पक्ष सोडू लागले आहेत.

# श्रीरामपूर बाजार समितीचा १६ कोटींचा अर्थसंकल्प

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** श्रीरामपूर तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीने पुढील २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १६ कोटींचा अर्थसंकल्प सादर केल्याची माहिती सभापती सुधिर नवले यांनी दिली. बाजार समितीत माजी आमदार भानुदास मुरकुटे व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक करण ससाणे यांच्या अधिपत्याखालील सत्ता आहे. यंदाच्या अर्थसंकल्पाप्रमाणे ५ कोटींचे एकुण उत्पन्न बाजार समितीला अपेक्षित आहे. त्यानुसार १ कोटी ३८ लाखांचा वाढावा होणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात ८ कोटी ७० लाख रुपयांची विविध विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यात श्रीरामपूर नगरपरिषद रस्त्यालगत ५ कोटी खर्चाच्या शेतकरी मॉल व्यापारी संकुलाची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी शेती महामंडळाची जमीन अधिग्रहण करण्यात येणार आहे. श्रीरामपूर येथील मुख्य कार्यालयासमोरील मुख्य रस्ता तसेच बेलापूर व टाकळीभान येथे अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, टाकळीभान येथे नवीन पेट्रोल पंपाची उभारणी, श्रीरामपूर येथील मुख्य बाजाराच्या आवारात साठवण टाकीअंतर्गत जलवाहिनी व नियोजित डाळिंब बाजार आदी कामे हाती घेतल्याचे नवले यांनी सांगितले. सध्या श्रीरामपूर येथील मुख्यालयाच्या आवारात कांदा मार्केटमध्ये २ कोटी खर्चाच्या रस्त्याचे काँक्रिटिकरण, १.५ कोटी रुपये खर्चाच्या १५ गाळ्यांचे काम पूर्णत्वाकडे आहे. बेलापूर उपबाजारात ६० लाख रुपये खर्चाच्या रस्त्याचे काँक्रिटिकरण व १२ लाख खर्चाच्या दुकान गाळ्यांची दुरुस्ती तसेच टाकळीभान येथील उपबाजारात ९.५ लाख खर्चाच्या दुकान गाळ्यांच्या दुरुस्तीचे काम सुरु सुरु आहे.

बाजार समितीची सर्व विकास कामे शेतकरी केंद्रास्थानी ठेऊन सुरु आहेत. प्रस्तावित कामांमबरोबरच श्रीरामपूर येथील पेट्रोल पंप आवारात सीएनजी गॅस केंद्र सुरु करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. संस्थेची ३० एप्रिल २०२३ रोजी निवडणूक होऊन आपण १३ मे २०२३ पासुन कारभार हाती घेतला असुन संस्थेचा कारभार काटकसरीने आणि पारदर्शी पद्धतीने सुरु असल्याचा दावा सभापती नवले आणि सचिव साहेबराव वाबळे यांनी केला.

# स्वागत फलकांची विटंबना; महायुतीचे निषेध आंदोलन

लोकसत्ता प्रतिनिधी



शहरात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी लावलेल्या फलकांची विटंबना करण्यात आल्याच्या घटनेचा राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप पदाधिकाऱ्यांनी निषेध करत फलक धुवून काढण्याचे आंदोलन केले.

**अहिल्यानगर :** शहरात सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने उभारलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्यासह स्पर्धेचे आयोजक आमदार संग्राम जगताप यांच्या फलकांची अज्ञात व्यक्तींनी विटंबना केली. या घटनेने आक्रमक झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत, जोरदार घोषणा देत घटनेच्या निषेधार्थ आज, शुक्रवारी आंदोलन केले तसेच पाण्याने फलक धुऊन काढले. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता.

भाजपचे महेंद्र गंधे, राष्ट्रवादीचे कुमारसिंह वाकळे, अजिंक्य बोरकर, वैभव ढाकणे, तुषार पोटे, निलेश बांगरे, भागवत कुरधरने, अमित गटणे, अशोक चोभे, योगेश ठुबे, दिनेश जोशी, भाऊ पुंड, सचिन पवार, गणेश गोरे, दादा पांडुळे, योगेश खताळ, मनीष फुलडहाळे, वैभव दळवी, संतोष फुलारे, चेतन लखापती, गौरव कचरे आदी आंदोलनात सहभागी होते. शहरातील छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर, महापालिकेसमोर ही घटना घडली. यावेळी तुषार पोटे म्हणाले, आमदार जगताप यांनी शहरात भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करून इतिहास रचला आहे.

परितोषिक वितरणास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व अनेक मंत्री येणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी फलक लावले आहेत. पण काही जिहादी समाजकंटकांना हे सहन न झाल्याने त्यांनी या फलकाची विटंबना केली. हा प्रकार या आधीही घडला. मात्र आता सहन करणार नाही. अजिंक्य बोरकर म्हणाले, शहरातील जिहादींना भगव्या वातावरणाची अडचण झाली आहे. त्यांच्यात समोर येण्याची हिम्मत राहिली नसल्याने पाठीमागून असे तुच्छ प्रकार करीत आहेत. शहरात या जिहादींची अतिक्रमणे आहेत. त्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याने मनपा आयुक्तांनी कारवाई न केल्यास आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल. वैभव ढाकणे यांच्यासह विविध वक्त्यांनी घटनेचा निषेध केला.

# अतिक्रमणे काढण्यासाठी व्यापाऱ्यांना १५ दिवसांची मुदत द्या -प्रकाश चित्ते

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** श्रीरामपूर शहरातील ३ व्यापाऱ्यांना उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दुकानातील सामान काढून घेण्यासाठी १५ दिवसांच्या मुदतीचा आदेश पालिकेला दिले आहेत. त्याच धर्तीवर श्रीरामपुरातील इतर व्यापाऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सर्वच व्यापाऱ्यांना त्यांचे अतिक्रमण काढून घेण्यासाठी १५ दिवसांची मुदत द्यावी, अशी मागणी भाजपचे प्रकाश चित्ते यांनी केली. यावेळी व्यापारी किरण लुणीया, राजेंद्र कांबळे, संजय पांडे, ॲड. अरूण लबडे, ॲड. जीवन पांडे, संजय यादव, सोमनाथ कदम, गणेश भिसे, शांतीलाल पोरवाल, बाळासाहेब गाडेकर, सिद्धार्थ साळवे, विशाल जाधव, विजय लांडे आदी उपस्थित होते. श्रीरामपूर शहरात नगरपालिकेने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली आहे. सरसकट अतिक्रमण काढली जात आहेत.

अनेक दुकानदारांचे नुकसान होत आहे. अतिक्रमणे काढण्यासाठी वेळ मिळावा यासाठी येथील काही दुकानदारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर काल गुरुवारी सुनावणी होऊन न्यायालयाने ३ अतिक्रमित दुकानदारांना १५ दिवसांची मुदत देण्याचे आदेश प्रशासनास दिले. याचा संदर्भात चित्ते म्हणाले, राज्यातील अनेक शहरांत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू आहे. श्रीरामपूर शहरातील नेवासे रस्त्यावरील विजय शेलार, सोमनाथ पतंगे, अहमद शेख यांनी न्यायालयात अतिक्रमण काढण्यासाठी वेळ मागितला होता. न्यायालयाने पंधरा दिवसात अतिक्रमण काढून घेण्याचे आदेश दिले आहेत. याचिकाकर्त्यांचे वतीने ॲड. राहुल तांबे, ॲड. कुलकर्णी यांनी अतिक्रमणधारकांची बाजू मांडताना सांगितले की, प्रशासनाने अचानक अतिक्रमण काढायला सुरुवात केल्यामुळे अनेकजण विस्थापित होत आहेत.

काही लोक स्वतःहून अतिक्रमण काढण्यास तयार आहेत, मात्र प्रशासन त्यांना वेळ देत नाही. वेळ दिल्यास ते अतिक्रमण काढून घेतील व त्यांचे होणारे आर्थिक नुकसान टळेल. हा युक्तिवाद ग्राह्य धरून खंडपीठाने पंधरा दिवसाची मुदत दिली. त्याच धर्तीवर श्रीरामपूरातील सर्व व्यापाऱ्यांना त्यांची अतिक्रमणे काढून घेण्यासाठी पंधरा दिवसाची मदत द्यावी अशी लेखी मागणी आपण मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्याकडे करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



# मेहेरबाबा अमरतिथीनिमित्त भाविकांचे मौन

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अवतार मेहेरबाबांच्या अमरतिथी सोहळ्यानिमित्त अरणगाव (ता. अहिल्यानगर) येथील समाधीस्थळी भाविकांनी आज, शुक्रवारी दुपारी १२ वा. पंधरा मिनिटे मौन पाळले. यावेळी सुमारे ५० हजारांवर भाविक उपस्थित होते.

अमरतिथी सोहळ्यासाठी जगभरातील भाविक कालच अरणगाव येथे दाखल झाले होते. आज सकाळी भजनाने सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. नंतर मेहरबून म्हणण्यात आली. समाधीचे दर्शन घेण्यासाठी रांगा लागल्या होत्या. मात्र कोठेही गडबड, गोंधळ नव्हता. भाविक शिस्तीचे पालन करत होते. दिवसभर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये मेहेरप्रेमींनी भजने, गजल, नृत्ये, कव्वाली, गाणे, नाटिका, सादर केल्या.

अवतर मेहेरबाबा ट्रस्टने भाविकांसाठी भव्य मंडप टाकला होता. मौनाच्या वेळी विलक्षण शांतता निर्माण झाली होती. परिसर भाविकांनी फुलून गेला होता.

# कृषी विद्यापीठाच्या प्रकल्पग्रस्तांना मिळणार नोकरीचा लाभ - नीलेश लंके

**अहिल्यानगर :** राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठासाठी जमिनी अधिगृहीत करण्यात आल्याने प्रकल्पग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांचे दाखले देण्याचा मार्ग शासन निर्णयामुळे मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे राहुरी व परिसरातील २०० तरूणांना नोकरीचा लाभ मिळणार असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. या निर्णयासाठी आपण गेल्या दोन वर्षांपासून राज्य शासनाकडे पाठपुरावा करत होतो, असे त्यांनी सांगितले.

या प्रकल्पग्रस्तांनी दाखल्यासाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी शाहूराव मोरे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. मात्र त्यांनी प्रकल्पग्रस्तांचे दाखले फेटाळले होते. दोन वर्षांपूर्वी राहुरी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक मधुकर पवार, विकास भिंगारदे, भूषण शेंडगे, जगदीश अडसुरे, कुणाल कर्डक, आरबाज शेख, रवींद्र गिरगुणे आदींनी तत्कालीन आमदार नीलेश लंके यांच्याकडे या प्रश्नाचे गाऱ्हाणे मांडले. लंके यांनी याप्रश्नी तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी साकडे घातले होते. खासदार लंके यांच्या पाठपुराव्यादरम्यान या प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र शासन आदेश काढावा लागेल असे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत होते. राज्यात नवे सरकार सत्तेवर आल्यानंतर खासदार लंके यांनी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांच्याशी चर्चा करून या प्रश्नात तोडगा काढण्याची मागणी केली. मंत्री जाधव पाटील यांना तसे निवेदनही सादर केले होते.



प्रकल्पग्रस्तांच्या दाखल्यांसाठी दोन वर्षांच्या पाठपुराव्यानंतर शासन निर्णय झाल्याने खासदार नीलेश लंके यांचा सत्कार करण्यात आला.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी ४१ केंद्रांवर १३ हजार ६६४ उमेदवार

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्तपूर्व परीक्षेचे आयोजन रविवारी (दि. २) सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत जिल्ह्यातील ४१ उपकेंद्रांवर करण्यात आले आहे. परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरात सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

परीक्षेसाठी जिल्ह्यातील केंद्रांवर १३ हजार ६६४ उमेदवार दाखल होणार असल्याची माहिती केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांनी दिली. परीक्षेच्या व्यवस्थेसाठो १० उपजिल्हाधिकारी दर्जाचे समन्वय अधिकारी, उपजिल्हाधिकारी दर्जाचे भरारी पथकातील अधिकारी, ४१ उपकेंद्रप्रमुख म्हणून वर्ग १ चे अधिकारी, ८२ सहायक, १३५ पर्यवेक्षक, ६५७ समवेक्षक, ४ लिपीक, ४१ केअर टेकर, ४१ बेलमन, ६५ शिपाई, १३५ पाणी वाटप कर्मचारी आणि ५३ वाहनचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना सकाळी ८.३० वा. परीक्षेच्या केंद्रात प्रवेश देण्यात येणार आहे.


## कोपरगाव नगरपरिषद, कोपरगाव

ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर

**जाहीर निविदा सुचना २०२५-२६**

**न.प. हद्दीत सण, उत्सव, महापुरुषांच्या जयंती व प्रासंगिक कार्यक्रम साजरे करणे करिता लायटिंग द्वारे विद्युत रोषणाई करणे** या कामाकरीता शासनाच्या योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदाराकडून बी १ द्वी-लिफाफा पद्धतीने निविदा मागवण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फी | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | न.प. हद्दीत सण, उत्सव, महापुरुषांच्या जयंती व प्रासंगिक कार्यक्रम साजरे करणे करिता लायटिंग व्दारे विद्युत रोषणाई करणे. | ५०००/- | १५००/- | ३६५ दिवस |

१) कोरे निविदा फॉर्म दि. ३१/०१/२०२५ पासून दि. ०७/०२/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस सोडुन निविदा फॉर्म फी रोखीने भरुन मिळतील.
२) वर नमुद केलेल्या सीलबंद निविदा दि. ०७/०२/२०२५ रोजी दुपारी ६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा द्वी-लिफाफा पध्दतीने सादर कराव्या लागतील. शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडणेत येतील.
३) अनामत रक्कम रोखीने अथवा डी. डी.च्या स्वरूपात स्विकारली जाईल. निविदेसोबत डी. डी. जोडावा अथवा अनामत रक्कम रोखीने भरल्यास त्यांची पावती जोडावी लागेल. धनादेश ग्राह्य धरण्यात येणार नाही.
४) निवीदा द्वि-लिफाफा पध्दतीने स्विकारण्यात येतील. लिफाफा क्र. १ मध्ये पात्रतेची, अनुभवाचे, नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र, ई.पी.एफ. प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रति टाकाव्यात. लिफाफा क्र. २ मध्ये दर नमुद केलेल्या निविदा टाकाव्यात दोन्ही लिफाफे एक मोठ्या लिफाफ्यात टाकावेत.
५) इतर शर्ती अटी तसेच नमुद कामांची अधिक माहिती नगरपरिषद विद्युत विभागात कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस सोडून मिळेल.
६) एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार कोपरगाव नगरपरिषद मा. मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
मुख्याधिकारी तथा प्रशासक
कोपरगांव नगरपरिषद, कोपरगाव



HDB FINANCIAL SERVICES

## एचडीबी फायनॅन्शिअल सर्व्हिसेस लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** राधिका, दुसरा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद, गुजरात, पिन कोड- 380009
**क्षेत्रीय कार्यालय:** पहिला मजला, विल्सन हाऊस, ओल्ड नागरदास मार्ग, अंधेरी (पू), मुंबई- 400069
**शाखा कार्यालय:** नगर पुणे रोड, अहमदनगर कॉलेजजवळ, पाहिला मजला, झुडीओ मॉलच्या वर, अहिल्यानगर (अहमदनगर)- 414001.

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव करण्यासाठी जाहीर सूचना**

**बयाणा रक्कम आणि दस्तावेज सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ 18.02.2025 रोजी 05.00 वाजेपर्यंत**

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सर्फेसी) अॅक्ट, 2002 (2002 चा 54) अंतर्गत **एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड** कडे तारण असलेल्या अचल मालमत्तेची विक्री ज्याअर्थी, **एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड** यांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी **''जशी आहे जेथे आहे आणि जशी आहे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्याच्या अधिकारासह आमच्या शाखेमधील पुढील खात्यांमध्ये सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सर्फेसी) अॅक्ट, 2002 मधील अनु. 13(2) अंतर्गत जारी केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने पुढील मालमत्तांचा ताबा घेतलेला होता.तो सीजेएसडी अहमदनगर यांचे समक्ष प्रलंबित असलेल्या **विशेष सी.एस.क्र. 209/2022 च्या निकालाच्या अधीन असेल.** सदर विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे **https://bankauctions.in** या वेबसाईटवरवरील ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून घेण्यात येईल.

**अचल मालमत्तांचे वर्णन**

| लॉट नं. | शाखेचे नाव, कर्ज खाते क्रमांक आणि ग्राहकाचे नाव | लिलाव विक्रींतर्गत तारण मालमत्तेचे वर्णन आणि ताब्याची स्थिती | मागणी सूचना दिनांक/ थकबाकी रक्कम (सुरक्षित कर्ज) | प्राधिकृत अधिकारयाचे तपशील | बयाणा रकमेच्या भरण्यासाठी खात्याचे तपशील | आरक्षित किंमत / बयाणा रक्कम / बोली वृद्धी रक्कम | ई-लिलावाची दिनांक/ वेळ आणि बयाणा रक्कम सादरीकरणाची शेवटची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड, तेलीखुंट, सर्जेपुरा रोड, कुबेर मार्केटजवळ, अहमदनगर, महाराष्ट्र- 414001. कर्ज खाते क्र. 7259040. 1. आकाश क्लिनिक. पत्ता: स.क्र. 12/29/22 ए, प्लॉट क्र. ए-104, दुकान क्र. 1, विठ्ठल अपा., भिस्तबाग नाक्याजवळ, सावेडी, अहमदनगर- 414003म महाराष्ट्र. 2. जयश्री उमेश निंबाळकर 3. उमेश रमाकांत निंबाळकर दोघेही राहणार: प्लॉट क्र. 25, चेतना कॉलनी, नगरपूर, महालक्ष्मी पार्कजवळ, नगर मनमाड रोड, अहमदनगर- 414003 महाराष्ट्र. | प्लॉट क्र. 25, क्षेत्रफळ सुमारे 55.44 चौ.मी., प्लॉट क्र. 26, क्षेत्रफळ सुमारे 54.00 चौ.मी.,प्लॉट क्र. 27, क्षेत्रफळ सुमारे 54.00 चौ.मी.,प्लॉट क्र. 28, क्षेत्रफळ सुमारे 54.00 चौ.मी.,प्लॉट क्र. 29, क्षेत्रफळ सुमारे 54.00 चौ.मी.,प्लॉट क्र. 30, क्षेत्रफळ सुमारे 54.00 चौ.मी.,प्लॉट क्र. 26, क्षेत्रफळ सुमारे 64.56 चौ.मी., सर्वे क्र. 91/1ए2 (जुना स.क्र. 94/1ए/2), नवनागापूर, अहमदनगर- 414003. चतुःसीमा: पूर्वेस- 9 मी. रस्ता, पश्चिमेस- प्लॉट क्र. 18 ते 24, उत्तरेस- स.क्र. 104/1, दक्षिणेस- 9 मी. रस्ता जे. ताब्याची स्थिती: प्रत्यक्ष/वास्तविक ताबा | 13.01.2022 / 13.01.2020 रोजी रु. 1,10,93,340.00/- (रुपये एक कोटी दहा लक्ष त्र्याणव हजार तीनशे चाळीस फक्त) अधिक वास्तविक वसूलीपर्यंतकरारातील दराने पुढील व्याज अधिक आनुषंगिक शुल्के, खर्च व अधिभार. | श्री विजयकुमार सपकाळ, मोबाईल क्र.:- 8888873781 ईमेल आयडी: Vijaykumar.sapkal@hdbfs.com | खाते क्र. 00210310002748, खात्याचे नाव: एचडीबीएफएस जनरल रिसीट्स, आयएफएससी कोड- HDFC0000021 बँक: एचडीएफसी बँक लि. शाखा: हैदराबाद- लकडीकापूल एमआयसीआर कोड- 500240002 | रु. 80,08,554/- (रुपये ऐंशी लक्ष आठ हजार पाचशे चौपन्न फक्त) / रु. 8,00,855/- (रुपये आठ लक्ष आठशे पंचावन्न फक्त) / *15,000.00/- | 19.02.2025 / स. 11 ते सायं. 5 वाजेपर्यंत सहभागींनी दिलेली सर्वोच्च बोली उघडण्यात आल्यानंतर 5 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारांसह. / बयाणा रक्कम सादरीकरणाचा शेवटचा दिनांक 18.02.2025, स. 11 ते सायं. 5 वाजेपर्यंत |

**अटी व शर्ती: सदर ई-लिलाव ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' तत्त्वावर घेण्यात येत आहे.**

1. प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी बोजे, लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेचा मालकी हक आणि मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे/अधिकार/थकबाकी इ. बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर ई-लिलाव जाहिरात एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड यांचेकडून देण्यात येणारे वचन नाही किंवा त्यांचे प्रतिनिधित्वसुद्धा करीत नसून तसे समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची विक्री एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड यांना ज्ञात किंवा अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. कुणीही कोणत्याही प्रकारचा दावा/अधिकाराची /थकबाकीची मागणी केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको जबाबदार नसतील. 2. बोली सादर करण्याअगोदर मत्तेची आणि विनिर्देशांची पाहणी करून स्वतःची खात्री करून घेण्याची जबाबदारी बोलीदाराची असेल. इच्छुक बोलीदारांना **दि. 04.02.2025 पर्यंत (कामकाजाच्या वेळेत)** लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेची पाहणी करता येईल. इच्छुक बोलीदारांनी लॉगइन आयडी व पासवर्ड च्या माध्यमातून फोरक्लोजर इंडिया वेब पोर्टल: **https://bankauctions.in** च्या माध्यमातून आपली बयाणा रक्कम सादर करावी (**https://bankauctions.in** येथे नाव नोंदवून युजर आयडी आणि पासवर्ड निःशुल्क प्राप्त करता येईल). बयाणा रक्कम वर नमूद खात्यामध्ये एनईएफटी/आरटीजीएस च्या माध्यमातून देय असेल. बोलीदाराने वेब पोर्टलवर नोंदणी (वन टाईम) केल्यानंतर इच्छुक बोलीदार/खरेदीदारास बोली दस्तावेजांच्या सादरीकरणाच्या शेवटचा दिनांक व वेळेअगोदर वेब पोर्टलवर पुढील दस्तावेजांच्या प्रती अपलोड कराव्या लागतील, i) एनईएफटी/आरटीजीएस चलन किंवा डिमांड ड्राफ्टची प्रत, ii) पॅन कार्डची प्रत, iii) मतदार ओळखपत्र/चालक परवाना/पारपत्र इ. ची स्वाक्षांकित प्रत सारखा ओळखीचा/पत्त्याचा पुरावा (केवायसी) त्याशिवाय बोली फेटाळण्यास पात्र ठरेल. परिशिष्ट-II व III (**https://bankauctions.in** या वेब पोर्टलवरून डाउनलोड करता येईल) नोंदणी करून ची स्कॅन केलेली प्रत भरून आणि स्वाक्षरी करून ती अपलोड करणेसुद्धा आवश्यक आहे. ज्या इच्छुक बोलीदारांना लॉग इन आयडी व पासवर्ड तयार करणे, माहिती अपलोड करणे, बोली दस्तावेज सादर करणे, ऑनलाईन आपसांत बोली बोलीबाबत प्रशिक्षण/प्रात्यक्षिक इ. बाबत मदत हवी आहे त्यांनी येथे संपर्क साधावा: **फोरक्लोजर इंडिया,** ब्लॉक क्र. 605 ए, सहावा मजला, मैत्रीवनम कमर्शियल कॉम्प्लेक्स, अमीरपेठ, हैदराबाद- 500038, ई-मेल आयडी: **https://bankauctions.in** सपोर्ट हेल्पलाईन क्रमांक: 8142000061 - **श्री यू. सुब्बाराव, क्षेत्रीय व्यवस्थापक, subbarao@bankauctions.in,** आणि 9515160064 - **श्री मनोज, आणि लँड लाईन: 040-23736405, मोबाईल: 8142000062/66, info@bankauctions.in** आणि मालमत्तेशी निगडीत इतर कोणत्याही यांचेशी सोमवार ते शनिवार कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा **एरिया कलेक्शन मॅनेजर, श्री चेतन धनगर; मोबाइल क्र: 7820829423, ईमेल आयडी: chetan.dhangar@hdbfs.com** आणि प्राधिकृत अधिकारी: **श्री विजयकुमार सपकाळ, मोबाईल क्र. 8888873781, ईमेल आयडी: vijaykumar.sapkal@hdbfs.com.** 3. इच्छुक बोलीदारांनी नोंदणी प्रक्रिया (वन टाईम) पूर्ण करून आणि आपला युजर आयडी व पासवर्ड तयार करून **दि. 18.02.2025 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत** आपले बोली दस्तावेज, बयाणा रक्कम (आरक्षित किमतीपेक्षा कमी नसावी) आणि आवश्यक कागदपत्रे (मुद्दा क्र. 4 मध्ये नमूद) सादर करणारया इच्छुक बोलीदारांना त्यांच्या दस्तावेजांची पडताळणी झाल्यावर आणि/किंवा प्राधिकृत अधिकारयांनी संमती दिल्यावर ई-लिलावात सहभागी होण्यास पात्र ठरविण्यात येईल. 4. ऑनलाईन आपसांत बोलीदरम्यान बोलीदारांना आपली बोलीमध्ये (वर नमूद करण्यात आलेल्या) 'बोली वृद्धी रकमेच्या' पटीत वृद्धी करता येईल आणि ई-लिलाव संपण्याच्या वेळेच्या शेवटच्या 5 मिनिटांत बोली देण्यात आल्यास बंद होण्याची वेळ (ई-लिलाव समाप्त होईपर्यंत प्रत्येक वेळी) आपोआप 5 मिनिटांनी वाढेल आणि, अन्यथा तो आपोआप बंद होईल. ई-लिलाव प्रक्रिया संपतेवेळी सर्वोच्च बोली रक्कम सादर करणारया (आरक्षित किमतीपेक्षा कमी नसावी) बोलीदारास पडताळणीनंतर प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनकोद्वारे यशस्वी बोलीदार घोषित करण्यात येईल. 5. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम विक्री रकमेचा काही भाग म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही. यशस्वी बोलीदारास प्राधिकृत अधिकारयाने बोलीची किमत स्वीकारल्यानंतर 24 तासांच्या आत बयाणा रक्कम समायोजित करून विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम जमा करावी लागेल आणि विक्री किमतीपैकी उर्वरित 75% रक्कम विक्रीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत किंवा प्राधिकृत अधिकारी लेखी मंजूर करतील त्या वाढीव कालावधीत सादर करावी लागेल. यशस्वी बोलीदाराने याप्रकारे भरणा करण्यात कसूर केल्यास त्याने तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव करण्यात येईल आणि अशी कसूर करणारया कर्जदारास सदर मालमत्ता/रकमेवर कोणताही दावा करता येणार नाही. 6. संभाव्य अर्हताधारक बोलीदार ई-लिलावाच्या दिनांकाअगोदर फोरक्लोजर इंडियायांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात. इंटरनेट/नेटवर्कची समस्या उद्भवल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी/ एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड किंवा फोरक्लोजर इंडियाजबाबदार नसतील आणि ई-लिलावात सहभागी होण्यासाठी आपण तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहोत किंवा नाही याची पाहणी करून आवश्यक ती तयारी करण्याची जबाबदारी इच्छुक बोलीदारांची असेल. 7. लागू असलेले मुद्रांक शुल्क/अतिरिक्त मुद्रांक शुल्क/हस्तांतरण शुल्क इ. चा तसेच कुणासही देणे असलेली वैधानिक/बिगर-वैधानिक थकबाकी, कर, दर, मूल्यांकन शुल्क, अधिभार इ. भरणा करण्याची जबाबदारी खरेदीदाराची असेल. 8. प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नसून त्यांना कुठलेही करण न देता कोणताही किंवा सर्वच प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा तसेच ई-लिलाव प्रक्रिया बरखास्त करण्याचा/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचाही अधिकार असेल. 9. बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी आरएफसी व्हेईकल दुनिया प्रा.लि.च्या वेब पोर्टलवर **https://bankauctions.in** येथे उपलब्ध असलेला अटी व शर्तींचा तपशील पाहावा. 10. सीजेएसडी अहमदनगर यांचे समक्ष प्रलंबित असलेल्या विशेष **सी.एस.क्र. 209/2022** मुळे सदर विक्रीची निश्चिती दिवाणी खटल्याच्या निकालाच्या अधीन असेल.

**विशेष सूचना:** 11. बोलीदारांनी स्वतःचे हित लक्षात घेता शेवटच्या क्षणी बोली देणे टाळावे कारण अशा वेळी कोणतीही समस्या उद्भवल्यास (इंटरनेट संपर्क तुटणे/वीजपुरवठा खंडित होणे इ.) त्यासाठी एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड किंवा सेवा पुरवठादार जबाबदार नसतील. अशी अप्रिय परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वीजपुरवठा, बॅक-अप यांसारखी सर्व आवश्यक ती व्यवस्था/पर्याय तयार ठेवावेत जेणेकरून त्यांना अशा अडचणींवर मात करून लिलावात यशस्वीपणे सहभागी होता येईल.

**सरफेसी अधिनियम, 2002 अंतर्गत 15 दिवसांची वैधानिक विक्री सूचना**

याद्वारे कर्जदार/जामीनदार यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद रकमेचा आणि अद्ययावत व्याज व आनुषंगिक खर्चाचा ई-लिलावाच्या दिनांकाअगोदर भरणा करावा, अन्यथा मालमत्तेचा लिलाव/विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कासह वसूल करण्यात येईल.

स्थान: अहमदनगर, दिनांक: 01.02.2025

स्वा/- प्राधिकृत अधिकारी, एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड